ISSN 2320-4494
RNI No. MAHMUL 03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## SPECIAL ISSUE
## IV JAN. 2021



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT | LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

Degloor College, Degloor Dist. Nanded

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

RNI No.MAHAUL03008/13/1/2012-TC

ISSN 2320-4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

*January Special Issue IV*

Editorial Officer

**Kranti Publication**
Georai Dist.Beed
Beed -431 127
Contact : 7875827115
E-mail : Sarkatelata@gmail.com

**Published By :**
Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price :** Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Vice Chancellor M.G.M.U. Aurangabad
& Ex.Vice Chancellor Y.C.M.U. Nasik
& Professor of Mass Communication
& Jornalism Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr.Pratibha Aher**
Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Sanjay Nawale**
Head of Dept. Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member
Dean, Faculty of Science,
Dr.B.A.M.U. Aurangabad

**EDITOR**

***Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Senate Member, Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U.Aurangabad
Associate Professor & Head, Dept. of Marathi, JBSPM's
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed.

**EDITOR BOARD**

**Dr. Mala Nurilmala**
Dept.of Aquatic Product Technology
Faculty of Fisheries and Marine Sciences
Bogor Agricultural University, Indonsia

**Dr. Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Dhere R.M.**
Dept.of Zoology
Swa.Sawarkar Mahavidayala, Beed

**Dr. Vasant Biradar**
Princial, Mahatma Phule
Mahavidyalaya,Ahmedpur,Dist.Latur

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.D.P. Takale**
Professor & Head
Dept. of Economics
L.B.S.College, Partur Dist.Jalna

**Dr.Ganesh Adgaonkar**
Kalika Devi ,Collage
Shirur Kasar Dist.Beed

**Dr.Aparna Ashtaputre**
Dept. of Psychology,
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr. Vitthal S. Jadhav**
Dept. of Pub.Administration,
Kalikadevi College, Shirur (K.), Dist.Beed

**Dr. Kadam Mangal S.**
PG Dept.of Zoology
Yeshwant Mahavidayala, Nanded

**Dr. Rajesh Karpe**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U.P.)

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S.College, Partur Dist Jalna

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College,
Phulambri Dist. Aurangabad'

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College, Mantha.
Dist. Jalna

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science College,
Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr.Fulchand Salampure**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**PEER REVIEW / REFERECS**

**Dr.Shahaji Gaikwad**
Ex-Chairman, BOS in English
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Vishwas Patil**
Radha Nagari College,Radha
Nagari, Dist. Kolhapur

**Dr. Dilip Khairnar**
Professor, Sociology
Deogiri College, Aurangabad

**Dr. Santos Chavan**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Shivaji Yadhav**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Laxmikant Shinde**
Assit.Professor
JES College, Jalna

**MANGING EDITORS**

**Mr. Ramesh Ringne**
**Prof. Bapu Ghokshe**
**Mr. Shivaji Kakade**
**Dr. Shakur Shaikh Husain**

**Mr. Vinod Kirdak**
**Dr. Datta Tangalwad**
**Mr. Kalandar Pathan**
**Dr. Suhas Morale**
**Dr. Baliram Katare**

**Assit.Prof.Mohan Kalkute**
**Dr. Adgaonkar Ganesh**
**Dr. Santosh Chavan**
**Dr. Rajkumar Yallawad**

DEGLOOR COLLEGE DEGLOOR * Dist.Nanded *

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | मराठी नाटकाचे बदलते तंत्र | डॉ.विकास बापूराव बहुले | 113-119 |
| 27 | 'समकालीन मराठी दलित कथेतील विद्रोही" | प्रा. युवराज धबडगे | 120-122 |
| 28 | दत्ता भगत यांच्या नाटकातील भाषिक परिवर्तन : एक अभ्यास | प्रा. डॉ. व्यंकट दिगंबरराव कोरेबोईनवाड | 123-125 |
| 29 | मराठी दलित साहित्याची सामाजिक भूमिका | प्रा.नवाजी गेंदलाल घरत | 126-129 |
| 30 | पाऊस पाणी : ओल्याचिंब अनुभवाचा थेट आविष्कार | प्रा.रेखा व्ही.इंगोले | 130-134 |
| 31 | व्यवहारभाषेतील आधुनिकीकरण | डॉ.प्रतीक्षा गायकवाड | 135-138 |
| 32 | 'शबरी" कादंबरीची नायिका : शबरी | प्रा.डॉ.चंद्रकांत दशरथ रुद्राक्ष | 139-144 |
| 33 | महात्मा फुले : विचार आणि कार्य | प्रा.डॉ.संजय मारोतराव देबडे | 145-149 |
| 34 | गावठाण : एक आकलन | डॉ.वैशाली भालसिंग | 150-157 |
| 35 | विभावरी शिरुरकर यांच्या "उमा" कादंबरीची नायिका | प्रा.डॉ.चंद्रकांत दशरथ रुद्राक्ष | 158-165 |
| 36 | समकालीन हिंदी उपन्यास और दलित जीवन | प्रा.खाडे विद्या बाबूराव | 166-170 |
| 37 | व्याकरण का उद्भव तथा महत्व | शिंदे प्रशांत हाबु | 171-175 |
| 38 | वर्तमान मानव जीवन में मूल्य शिक्षा की भूमिका | डॉ. विलास तुकाराम राठोड़ | 176-181 |
| 39 | सकारात्मकतेचे ऊर्जाकेंद्र-मंदिर | प्रा. डॉ. सुनिता शं. कुरूडे | 182-186 |
| 40 | शेतकऱ्यांचे हित जोपासणारे शिवराय | डॉ. संजय गोपालराव ठवळे | 187-190 |
| 41 | भारतीय संस्थानाचे भारतात विलीनीकरणाची भुमीका | प्रा. डॉ. शिवाजी लक्ष्मण नागरगोजे | 191-193 |
| 42 | २१व्या शतकातील संयुक्त राष्ट्र संघाची उद्दिष्टे | डॉ. प्रा. अश्विनी अविनाश खापरे | 194-197 |
| 43 | धर्मांतरण व डॉ. बाबासाहेब आंबेडकर | प्रा. तळणीकर एस. जी. | 198-200 |
| 44 | भारतीय प्रजासत्ताकासमोरील आव्हाने | डॉ.आण्णासाहेब हारदारे | 201-204 |
| 45 | वैदुसमाजाची राजकीय वाटचाल | श्री.अशोक चंदर शिंदे | 205-210 |
| 46 | चार्लस हर्टन कुले यांची प्राथमिक गटातील कुटुंबाची संकल्पना आणि एकविसाव्या शतकातील कुटुंबाची सदयस्थिती | डॉ. संजय सुरेवाड | 211-215 |
| 47 | भारतातील स्त्री-पुरुष गुणोत्तरांतील असमतोल : स्वरुप, कारणे, उपाय | प्रा.भांडवलकर बी.एन. | 216-218 |
| 48 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जातिविषयक विचार | प्रा.डॉ. गणेश तुकाराम मोकासरे | 219-222 |
| 49 | वातावरणाच्या रचनेचा एक भौगोलिक अभ्यास | डॉ. बोबडे बबन्र बाबुराव | 223-227 |
| 50 | नैसर्गिक आपत्ती : सामाजिक परिणाम व व्यवस्थापन | प्रा. डॉ चंद्रकांत वामनराव गजेवाड | 228-231 |
| 51 | शरीर धारणेवर परिणामकरणारे घटक | प्रा. हेमंत त्रिंबकराव शिंदे | 232-233 |
| 52 | ख्याल गीतप्रकाराच्या विषयांतून घडणारे भारतीय संस्कृतीच्या विविधतेचे दर्शन | प्रा.डॉ.रवींद्र रामभाऊ इंगळे | 234-236 |
| 53 | महाराष्ट्र राजयामध्ये पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे व्यावस्थापन : एक भौगोलिक अभ्यास | प्रा.डॉ. घोडके जे.व्ही | 237-239 |
| 54 | शालापुर्व बालकांच्या कुपोषणाचा अभ्यास व उपाय | संशोधक : वर्षा अंकुश दाभाडे | 240-242 |


Degloor College ... Dist.Nanded

# महात्मा फुले : विचार आणि कार्य

**प्रा.डॉ.संजय मारोतराव देबडे**

देगलूर महाविद्यालय देगलूर जि.नांदेड

**प्रस्तावना :**

भारताच्या इतिहासात १९ वे शतक हे प्रबोधनपर चळवळीचे शतक म्हणून ओळखले जाते. या शतकात अनेक समाजसुधारकांनी समाज सुधारणेचे कार्य हाती घेतले. महात्मा जोतीराव फुले यातील सर्वात अग्रणी समाजसुधारक होय. महात्मा फुले हे एक थोर विचारवंत, लेखक, समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि स्त्री-शुद्र, अतिशुद्रांचे महान उध्दारक होते. महात्मा फुले यांचे संपूर्ण लेखन व कार्य हे सामाजिक समस्यांशी निगडीत असल्यामुळे वैचारिक, बौध्दीक व सामाजिक विकासाला मदत झाली आहे. महात्मा फुले यांनी तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे केवळ विश्लेषणच केले नसुन त्या परिस्थितीत आवश्यक त्या योग्य सुधारणा करुन स्त्री-शुद्र, अतिशुद्रांचे जीवन कसे सुखी व संपन्न होईल, या दृष्टिने प्रयत्न करुन भारतीय समाजाला योग्य दिशा दिली. त्यांच्या विचाराला प्रत्यक्ष कार्याची जोड असल्यामुळे भारताच्या सामाजिक जीवनाला एक नवी दिशा मिळाली.

**जीवन परिचय :**

म.जोतीराव फुले यांचा जन्म इ.स.१८२७ साली पुणे येथे झाला. त्यांचे मुळ गाव सातारा जिल्ह्यात असून त्यांचे मुळ आडनाव गोरे व जात फुलमाळी आहे. त्यांचे वडील गोविंदराव हे बागकाम व फुल विक्रीचा व्यवसाय करीत असल्यामुळे त्यांचे गोरे हे आडनाव जाऊन फुले हे आडनाव पडले. ज्योतीराव अवघे नऊ महिन्याचे असताना त्यांची आई चिमनबाई यांचे निधन झाल्याने ज्योतीरावाचा सांभाळ त्यांच्या आजीने केला. ज्योतीरावांचे वडील घराशेजारील मिशनरी लोकांना फुले, भाजीपाला द्यायला जात असत. सोबत जोतीरावही जात असत. फुल्यांचे शेजारी गफारबेग मुन्शी या विद्वान मुस्लीम व्यक्ती आणि लेजिट या इंग्रज अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनामुळे जोतीरावांचा शिक्षणाला सुरुवात झाली. परंतु शुद्रांच्या विद्यासंपादनास धर्म मार्तंडाच्या विरोधामुळे जोतीरावांना काही काळ शिक्षण सोडून बागकाम करावे लागले. तसेच ब्राह्मण मित्राच्या लग्नात शुद्र म्हणुन त्यांना अपमानीत करण्यात आले. त्यामुळे जोतीराव अस्वस्थ होऊन समाज व्यवस्था व धर्मव्यवस्थेचा बारकाईने विचार करु लागले. ख्रिश्चन मिशनरीमुळे त्यांच्यावर भारतीय विचारांबरोबरच पाश्चात विचारवंत व युरोपातील लढयांचा प्रभाव पडला. प्रत्यक्ष जीवनात आलेले अनुभव आणि समाजातील शोषण पाहुन महात्मा जोतीराव फुलेंनी भारतातील जातीव्यवस्था आणि स्त्रीशुद्र अतिशुद्राच्या गुलामगिरी विरुध्द लढा देण्याचे ठरविले. भारतातील सामाजिक विषमतेची मूळ शोधुन काढण्यासाठी महात्मा फुले यांनी धर्म चिकित्सा केली. वैदीक धर्म व्यवस्थेकडुन चातुर्वर्णाच्या आधारे हजारो वर्षापासुन बहुसंख्य लोकांचे शोषण केले जात होते. अशा शोषणापासुन समाजाला मुक्त करण्यासाठी त्यांनी धर्मचिकित्सा करुन वैदिक धर्म व्यवस्थेविरुध्द बंड पुकारले. महात्मा फुले यांच्या बंडखोरी बद्दल तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री

जोशी म्हणतात "भारतातील परंपरागत समाज संस्थांच्या विरुध्द बंड करणारे पहिले पुरुष म्हणजे ज्योतीबा फुले होत. अशा बंडाची प्रेरणा त्यांना कुठून मिळाली ? भारतातील परंपरावादी समाजसंस्थांची व या समाजसंस्थाच्या नियमधर्माची पकड हजारो वर्ष येथील जनमानसात पक्की बसलेली होती. या ठिकाणी सामाजिक जन्मसिध्द उच्चनीच भाव हे ईश्वरी संकेताने व माणसांच्या पुवकर्माने निर्माण झालेले आहेत. म्हणुन यांच्या विरुध्द प्रयत्न करणे हे महापाप आहे. अशी समजुत होती. या महापापाची म्हणजेच अपवित्रतेची भिती येथील जनमानसात कायम घर करुन बसली होती. ही खोलपणे सहस्त्रावधी वर्ष रुजलेली भीती घालविणारी जबरदस्त प्रेरणा ज्योतीबा फुले यांना कुठून मिळाली."[१] स्त्रीशुद्र अतिशुद्राची दयनीय स्थिती, समाजाचे होणारे शोषण आणि प्रत्यक्ष जिवनात आलेले अनेक अनुभव यातुन जोतीराव यांना बंडाची प्रेरणा मिळाली असावी.

**लेखनकार्य :**

समाज प्रबोधनातून नव समाजाची निर्मिती व्हावी या हेतूने महात्मा फुले यांनी विपुल लेखन कार्य केले आहे. 'शेतकऱ्यांचा असुड', 'गुलामगिरी', 'ब्राम्हणाचे कसब', 'सार्वजनिक सत्यधर्म' या महत्वपूर्ण ग्रंथाबरोबरच त्यांचे 'अखंड' रचना समाजाचे शोषण करणाऱ्या शोषक व्यवस्थेवर जोरदार प्रहार करणारी आहे. समाजातील पाखंडीपणावर आपल्या लेखणीतून प्रहार करतांना फुले म्हणतात,

"जप अनुष्ठानें स्त्रिया मुले होती ||
दुजा कां करीती || मुलासाठी ? ||१||
भट ब्राह्मणांत बहु स्त्रिया वांझ ||
अनुष्ठानी बीज || नाही का रे" ||२||[२]

स्वतःचे पोट भरण्यासाठी जप अनुष्ठान घालणाऱ्या भट वर्गाला वरील अखंडातुन महात्मा फुलांनी कटघऱ्यात उभे केले. धर्माच्या क्षेत्रातील ढोंगीपणा, दांभिकतेवर प्रकाश टाकताना दुसऱ्या एका अखंडात महात्मा फुले म्हणतात,

"कल्पनेचे देव कोरीले उदंड ||
रचीले पाखंड || हितासाठी ||१||
किन्नर गंधर्व ग्रंथी नाचवीले ||
अज्ञ फसवीले || कृत्रिमानें ||२||
निर्लज्य सोवळे त्यांचे अधिष्ठान ||
भोंदीती निदान || शुद्रादीक ||३||
ब्राह्मणांनी नित्य होऊनी निःसंग ||
शुद्र केले नंग || जोती म्हणे ||४||[३]

समाजातील ढोंगीपणावर प्रहार करतांना ज्योतीरावांची भाषा खूपच कठोर असली तरी सत्य हाच धर्म मानणारे महात्मा फुले मनाने मात्र खूपच संवेदनशील होते. त्यांच्या मनात मानव जातीबद्दल असलेले





प्रेम पुढील अखंडातून दिसुन येते.

"ख्रिस्त महंमद मांग ब्राह्मणाशी ||
धरावे पोटाशी || बंधुपरी ||
मानव भावंडे सर्व एकसहा ||
त्याजमध्ये आहा तुम्ही || सर्व ||"[४]

महात्मा फुले यांनी धर्मचिकीत्सा करुन कर्मठ ब्राह्मणांवर कठोर टीका केली आहे. शोषकाचा वर्ग म्हणुन ब्राह्मणाकडे पाहिले आहे. तो माणुस म्हणुन मात्र मान्य आहे. याबाबतीत डॉ.आ.ह.साळुंके म्हणतात "फुल्यांनी एकीकडे ब्राह्मणांवर अत्यंत कठोर टिका केली, परंतु दुसरीकडे मानव भावंडामध्ये त्यांचा अंतर्भाव करुन भावाप्रमाणे त्यांना पोटाशी कवटाळण्याची भाषा केली आहे. ब्राह्मण शोषक म्हणून नको असले तरी बंधु म्हणून हवे आहेत असा त्याचा अर्थ होतो."[५] वरील विवेचनावरुन महात्मा फुल्यांचे मानव जातीवरील प्रेम अधोरेखीत होते.

**फुले दांपत्याचे कार्य :**

महात्मा जोतीराव आणि सावित्रीबाई फुले यांना स्त्रिया, शुद्र - अतिशुद्र, विधवा, शेतकरी, शेतमजूर या वर्गाबाबत प्रचंड कळवळा होता. शिक्षणाशिवाय कुठलीही प्रगती शक्य नाही, हे ओळखून त्यांनी शुद्रातिशुद्र आणि स्त्रीयांना शिक्षीत करण्याचे ठरविले. परंतु त्यांच्या पुढे मुर्लीना शिकवणार कोण ? हा प्रश्न होता. जोतीरावांनी या कार्यासाठी सावित्रीबाईना तयार केले. त्यांनी सर्वप्रथम सावित्रीबाईना शिक्षण दिले. अवघाचा संसार सुखाचा करिन या बाण्याने त्या जोतीरावाची साथ देण्यास सिध्द झाल्या. सावित्रीबाईच्या शिक्षणाला सासु-सासऱ्यासह भाऊबंदकीचाही विरोध झाला. या दापंत्याची प्रचंड अवहेलना व मानहानी झाली. परंतु जोतीराव व सावित्रीबाई यांनी प्रत्येक अडचणीच्या प्रसंगाला धाडसानी तोंड देत कार्य सुरु ठेवले. सन १८४८ साली त्यांनी पुण्यात मुर्लीची पहिली शाळा सुरु केली. सावित्रीबाई पहिल्या शिक्षिका व मुख्याध्यापिका बनल्या. सर्वप्रथम जोतीरावांनी आपल्या मित्रांच्या मुर्लीना प्रवेश दिला. हळूहळू शाळेचा लौकीक वाढून इतर दोन शाळा सुरु झाल्या. परंतु सावित्रीबाईंना मात्र येता जाता रस्त्यावर दगड, शेण, अपशब्द, निर्भत्सना सहन करावा लागला. अशा प्रकारे भारतात स्त्री शिक्षणाची या दोन दांपत्याच्या प्रयत्नाने सुरुवात झाली.

जोतीराव फुले यांनी स्त्री शिक्षणाबरोबरच स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. त्यांच्या मते, स्त्री-पुरुष समान असून त्यांची बुध्दी एकसमान आहे. परंतु जगातील सर्व धर्मग्रंथ, पुरुषांनी लिहिल्यामुळे आपल्या स्वार्थासाठी स्त्रियांचे सर्व नैसर्गीक हक्क नाकारुन स्त्रीयांना गुलाम बनविले. वास्तविक स्त्रिया या कांही बाबतीत पुरुषापेक्षाही श्रेष्ठ असल्याचे ते मानतात.

म.फुले यांनी १८५२ साली अस्पृश्य मुलामुलींसाठी पुण्यातील अहिल्याश्रमात शाळा सुरु केली. शुद्रातिशुद्राचा मुलांना शिक्षण देणे हा हेतू त्या मागे होता. या अस्पृश्य मुलांचे पोटच्या मुलाप्रमाणे सावित्रीबाईंनी पालन पोषण करुन त्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले. धर्ममार्तडांनी फुले दापत्यांचा या कार्यामुळे खूप छळ केला पण ते आपल्या ध्येयापासून हटले नाही.

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

स्त्री व शुद्रांच्या शिक्षणाबरोबरच समाजातील इतर वाईट प्रथा, परंपरा जसे - बालविवाह, बालविधवा बहुपत्नीत्व या समस्या फुले दांपत्याना प्रखरतेने जाणवू लागल्या. बाल विधवा समस्या सोडविण्यासाठी त्यांनी १८६४ साली बालविधवा पुर्नविवाहाचे समर्थन करुन पुण्यात पहिला पुर्नविवाह घडवून आणला तसेच आपल्या घरात बालहत्त्या प्रतिबंधगृह स्थापन करुन बालविधवा गरोदर माताच्या बाळंतपणाची सोय केली. या कामी सावित्रीबाई स्वतः (दायी) सूईन बनल्या. या दांपत्यानी वर्ण व जातीव्यवस्थेला लाथ मारुन १८८५ मध्ये एका विधवा ब्राह्मण स्त्रियांचे बाळांतपण करुन त्या मुलाला दत्तक घेतले. जोतीरावांनी ब्राह्मण समाजातील विधवांच्या केशवपणाविरुध्द आंदोलन उभे केले.

जोतीरावांच्या या सर्व सामाजिक सुधारणाच्या कार्यात सावित्रीबाईंनी खांद्याला खांद्या लावून कार्य केले. त्या जोतीरावाप्रमाणे जिद्दी व दृष्टया होत्या. त्यांच्या ठिकाणी जोतीरावाप्रमाणे अलौकिक असे गुण होते. म्हणून त्यांनी स्वतःचा संसार व मुल बाळ ही गोष्ट सोडून आपल्या आदर्श पतीबरोबर जगाचा संसार पत्कारला. सावित्रीबाईसारखी कर्तबगार पत्नी लाभल्यामुळे जोतीराव आपले सेवा कार्य करु शकले.

**शेती व शेतकऱ्यांबाबत विचार :**

जोतीराव हे विचारवंत सुधारकाबरोबरच एक कृषीतज्ज्ञ होते. हे त्यांच्या शेती विषयक चिंतनावरुन लक्षात येते. स्त्री, शुद्र व कष्टकरी शेतकरी हाच त्यांचा चिंतनाचा विषय होता. त्यांच्या मते भारत हा मूलतः कृषि समाज आहे. त्यामुळे शेतीच्या विकासावरच आपल्या देशाचा विकास अवलंबून आहे. शेतकऱ्यांची दयनीय अवस्था पाहून त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न पोटतिडकीने मांडलेले दिसतात. शेतकऱ्यांच्या शोषणामागे व हलाखीच्या परिस्थितीमागे धर्मशास्त्र व शासनाची धोरणं जबाबदार असल्याचे ते सांगतात. शेती व शेतकऱ्यांच्या शोषण व समस्यांवर प्रकाश टाकण्याबरोबरच त्यांच्या समस्या, प्रश्न कसे सुटतील याबाबतही उपाय सुचवितात. येथील शेतकरी शेतीसाठी गाय-बैलावर अवलंबून असल्यामुळे गाई-बैलाची हत्या बंदीचा कायदा सरकारने करावा, जमिनीला बंधारे घालावे, वृक्षतोड थांबवून विहीरी खोदाव्यात, शेणखतासाठी परदेशी शेळ्या मेंढयाचा वंश वाढवावा, शेतकऱ्यांच्या पिकांचे रक्षण पोलिसांनी करावे, शेतकऱ्यांच्या मुलांना उत्तम शेतीचे शिक्षण द्यावे, नाटक तमाशांना गावात वंदी घालावी अशी मागणी त्यांनी केली. त्यांचा विचारांचा प्रभाव तत्कालीन तसेच नंतरच्या शासनावर पडल्याचे दिसून येते. आज ज्या शेतकरी चळवळी उदयाला आल्या आहेत त्यांचा पाया म.फुले यांच्या विचारात दिसून येतो.

**म.फुले , शाहु महाराज, आंबेडकर :**

म.फुले यांनी मांडलेल्या विचारांचा प्रभाव बऱ्याच जणावर पडला असून त्यांचा विचार अनेकांनी व्यक्तीगतरित्या व सामुहिकरित्या स्वीकारला आणि अंमलात आणला. शिक्षण सामान्यापर्यंत गेले पाहिजे हा विचार, स्त्री-शुद्रांच्या उन्नतीचा विचार, शेती, व्यापार बळकट करण्याचा विचार, राष्ट्र निर्मितीचा विचार, धर्म-निरपेक्ष बंधुभाव वाढविण्याचा विचार, भेदभाव नष्ट करण्याचा विचार, स्त्री-पुरुष समानतेचा विचार, शोषणाविरुध्दचा विचार, सामाजिक न्यायाचा, स्वातंत्र्याचा, मानवी हक्काचा विचार हे सर्व समाज परिवर्तनासाठी उपयुक्त ठरले. शाहु महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, वि.रा.शिंदे, म.फुलेच्या विचारांचा स्वीकार करून तो प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्र व भारतातील विविध परिवर्तनवादी चळवळीला म.फुले यांच्या विचारांचे अधिष्ठान लाभले.





म.फुले यांच्या सामाजिक कार्याचे मोल ओळखून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना आपले गुरु मानले. म.फुलेच्या कार्याचा गौरव करतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "म.ज्योतीबा फुले हे आधुनिक युगातील सर्वात मोठे शूर होते. त्यांनी हिंदुतील खालच्या थरातील वर्गांना वरिष्ठांनी लादलेल्या गुलामगिरी संबंधी जागृती केले. परकीय साम्राज्यापासुन स्वातंत्र मिळविण्यापेक्षा भारताला प्रथम सामाजिक लोकशाहीची अत्यंत आवश्यकता आहे, या फार मोठ्या तत्वाची शिकवण त्यांनी दिली. "[६]

भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्वामधून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी म.फुलेच्या विचारांना महत्त्वाचे स्थान दिले. राज्यघटनेतील समतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार, शोषणाविरुध्दचा अधिकार, धर्मनिरपेक्षता, आरक्षणाची तरतूद, अस्पृश्यता बंदीची तरतुद, तसेच मार्गदर्शक तत्वांमध्ये सामाजिक व आर्थिक विकासाच्या तरतुदी इ. च्या पाठीमागे फुले यांच्या विचारांची प्रेरणा दिसते.

**सारांश :**

समाजातील दुर्बल घटकांच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक विकासाचा कार्यक्रम म्हणून ज्या गोष्टी आज आपण घोषित करीत आहोत त्या सर्व गोष्टी जोतीरावानी १६० वर्षापूर्वी ठोस शब्दात मांडल्याचे दिसते. तसेच त्या गोष्टी प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी आपल्या जीवाचे रान केलेले दिसते. त्यांच्या विचारांची झेप, जात, धर्म, राष्ट्र यांच्या मर्यादा ओलांडून मानवी संस्कृतीपर्यंत गेलेली दिसते.

**संदर्भ :**

१) फडके य.दि. (सं), महात्मा फुले वाङःमय, म.रा.सा. आणि सं मंडळ, मुंबई चौ.आ.१९९१ पृ.१६
२) तत्रैव, पृ. ५३५
३) तत्रैव, पृ. ५४२
४) तत्रैव, पृ. ५३७
५) साळुंके आ.ह. , महात्मा फुले आणि धर्म लोकवाङ्मय गृह, मुंबई, नव्वी आवृत्ती २००९ पृ.१७, १८
६) खरात शंकरराव, अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, द्वि.आ. २००४ पृ. ५

◆◆◆



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded
ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded